महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३४९ वा | दिनांक : ०३/१२/२०२५ | वार : बुधवार

## एकमत असते तर आम्ही वेगळ्या पक्षांत नसतो - मुख्यमंत्र्यांचा टोला?



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातील कथित मतभेद राज्याच्या राजकारणात चर्चेचा विषय ठरलेत. या दोन्ही नेत्यांनी यापूर्वी अनेकदा आपल्यात मतभेद असल्याचा आरोप फेटाळून लावला आहे. पण त्यानंतरही या चर्चेला पूर्णविराम मिळत नाही. आज अखेर फडणवीसांनी या मुद्यावर सविस्तर उत्तर दिले. पण त्याचवेळी आमच्यात एकमत असते तर आम्ही वेगवेगळ्या पक्षात असतो का? असा सवालही केला. त्यांच्या या विधानाचे राजकीय वर्तुळात वेगवेगळे अर्थ लावले जात आहेत.

देवेंद्र फडणवीस व एकनाथ शिंदे सोमवारी छत्रपती संभाजीनगरमध्ये एकाच हॉटेलमध्ये वास्तव्यास होते. पण त्यानंतरही त्यांनी एकमेकांची भेट घेतली नव्हती. फडणवीस हे शिंदे तयार होण्यापूर्वीच तासभर अगोदर हॉटेलातून निघून गेले. त्यानंतर शिंदे बाहेर पडले. या घटनेमुळे महायुती सरकारमधील २ बड्या राजकीय पक्षांचे नेतृत्व करणाऱ्या या नेत्यांत काही मतभेद आहेत का? असा प्रश्न माध्यमांत व राजकीय वर्तुळात चर्चिला गेला. त्यावर आता मुख्यमंत्री फडणवीसांनी 'साम' वृत्तवाहिनीशी साधलेल्या संवादात सविस्तर उत्तर दिले आहे.

मुख्यमंत्री म्हणाले, माझ्यात व एकनाथ शिंदे यांच्यात कोणतेही वाद नाहीत. आपल्या घरातही दोन भावांची मते काहीअंशी वेगवेगळी असतात. ती मते एक नसतात. दोन्ही भाऊ प्रखरतेने आपापली मते मांडत असतात. तसेच काही गोष्टींवर आमचे एकमत होत नाही. सगळ्या गोष्टींवर आमचे एकमत असते तर आम्ही वेगवेगळ्या पक्षांत का राहिलो असतो? आम्ही एकच पक्ष असतो. पण आम्ही वेगवेगळे पक्ष आहोत. व्यापक दृष्टिकोनातून पाहिले तर आम्ही एकत्रच आहोत आणि आम्ही एकत्रच राहणार आहोत.

एखाद्या निवडणुकीत काही गोष्टी घडल्या की लगेच मतभेद झाले असे काहीही नसते. स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक ही कार्यकर्त्यांची आहे. निवडणुका आल्या की आम्ही तुमच्यावर गोष्टी लागू असे करता येत नाही, असे फडणवीस म्हणाले.

## हिंगोलीत आमदार बांगर यांच्यावर मतदान गोपनीयता भंग प्रकरणी गुन्हा



**हिंगोली :** हिंगोली व कळमनुरी नगरपालिका निवडणुकीत मंगळवारी ता. २ सकाळपासूनच मतदान प्रक्रिया सुरळीत सुरु झाली आहे. दुपारी दिड वाजेपर्यंत हिंगोलीत ३६.६८ टक्के तर कळमनुरीत ३९.७२ टक्के मतदान झाले आहे. दरम्यान, हिंगोलीत मतदाराला निवडूक चिन्ह सांगून मतदानाची गोपनियता भंग केल्याप्रकरणी सत्ताधारी शिवसेनेचे आमदार संतोष बांगर यांच्यावर हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हिंगोली नगर पालिकेच्या ३४ तर कळमनुरी नगर पालिकेच्या २० जागांसाठी मतदान घेतले जात आहे. हिंगोलीत ७८ तर कळमनुरीत २८ मतदान केंद्रावर सकाळपासूनच मतदानासाठी नागरीकांची गर्दी झाली होती. सकाळी मॉकपोलच्या वेळी काही ठिकाणी मतदान यंत्रात बिघाड झाल्याचे दिसून आले. यामध्ये हिंगोली शहरातील गणेशवाडी मतदान केंद्रावर मशीनचे बटन दबत नसल्याने मतदान यंत्र बदलण्यात आले आहे. त्यामुळे सकाळी नागरीकांच्या रांगा दिसून आल्या होत्या. या शिवाय कळमनुरी येथे पाच ठिकाणी मशीन बदलण्यात आल्याची माहिती आहे.

दरम्यान, मतदान केंद्राच्या बाहेर उमेदवार व समर्थकांची कडाक्याच्या थंडीतही गर्दी झाली होती. दोन्ही ठिकाणी कुठेही अनुचीत प्रकार घडू नये यासाठी संवेदनशील मतदान केंद्रावर राज्य राखीव दल तैनात करण्यात आले आहे. या शिवाय जिल्हयातील पोलिस अधिकारी व कर्मचारी बंदोबस्तावर तैनात केले आहेत. पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, उपाधिक्षक राजकुमार केंद्रे, गुन्हे शाखेचे निरीक्षक मोहन भोसले यांनीही सर्व मतदान केंद्रावर भेटी देण्यास सुरवात केली आहे. या शिवाय कुठेही अनुचीत प्रकार करणाऱ्यावर तातडीने कारवाई करण्याच्या सूचना पोलिस अधिक्षक कोकाटे यांनी दिल्या आहेत.

दरम्यान, हिंगोली येथील एका मतदान केंद्रावर शिंदेसेनेचे आमदार संतोष बांगर यांनी महिला मतदारास मतदान चिन्ह सांगून गोपनियतेचा भंग केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी दिलीप चव्हाण यांनी दिलेल्या तक्रारीवरून हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

## निवडणूक आयोगाची सर्कस झालीये का? : मुदत संपल्यानंतर ३३ हजार मतदार आले कुठून? मुंबईच्या मतदार यादीवरून आदित्य ठाकरेंचा संताप



**मुंबई :** महानगरपालिकेच्या २० नोव्हेंबरला प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीत अक्षम्य चुका आणि बोगस मतदारांचा भरणा असल्याचे समोर आले आहे. यावरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी निवडणूक आयोगावर जोरदार हल्लाबोल केला आहे. "आमचे आमदार सुनील शिंदे यांचे नाव यादीत तब्बल ७ वेळा, तर माजी महापौर श्रद्धा जाधव यांचे नाव ८ वेळा आले आहे. हा काय सावळागोंधळ सुरू आहे? निवडणूक आयोग म्हणजे एखादी सर्कस झाली आहे का?" असा संतप्त सवाल विचारत, मतदार यादीत ३३ हजार बोगस मतदान घुसवल्याचा आरोप आदित्य ठाकरे यांनी केलाय.

पत्रकार परिषदेत बोलताना आदित्य ठाकरे यांनी आयोगाचा भोंगळ कारभार पुराव्यानिशी मांडला. ते म्हणाले, "यादीत आमचे आमदार सुनील शिंदे यांचे नाव सात ठिकाणी आले आहे. गंमत म्हणजे प्रत्येक ठिकाणी त्यांचे वय आणि फोटो वेगळा आहे, पण व्यक्ती तीच आहे. श्रद्धा जाधव, खासदार अनिल देसाई आणि ज्योती गायकवाड यांचीही नावे दुबार आली आहेत. विशेष म्हणजे, या दुबार नावांमध्ये मराठी मतदारांची संख्या अधिक असल्याचे दिसून येत आहे." हा योगायोग आहे की सुनियोजित कट, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

आदित्य ठाकरे यांनी आणखी एक गंभीर मुद्दा मांडला. "नियमानुसार १ जुलै २०२५ नंतर मतदार यादीत नवीन नावे समाविष्ट करता येत नाहीत. असे असतानाही, या यादीत तब्बल ३३ हजार नवीन मतदार कसे काय आले?" असा सवाल त्यांनी केला. तसेच, ५ लाख ८६ हजार लोकांची दुबार नोंदणी असून, ज्या मृत व्यक्तींचे डेथ सर्टिफिकेट जमा केले आहे, त्यांची नावेही यादीतून वगळण्यात आलेली नाहीत. यामुळे त्यांच्या नावावर 'प्रॉक्सी वोटिंग' (बोगस मतदान) करण्याचा डाव आहे का? अशी शंका त्यांनी उपस्थित केली.

मतदार यादी तपासणीसाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांवरही (BLO) आदित्य ठाकरेंनी ताशेरे ओढले. "ज्यांना धड लिहिता-वाचता येत नाही, असे लोक मतदार तपासणी करत आहेत. हा सर्व प्रकार म्हणजे मुंबईकरांची थट्टा सुरू आहे," असा आरोप त्यांनी केला. आम्ही BMC, राज्य आणि केंद्र निवडणूक आयोगाला विचारात आहोत तुम्ही काय करत आहात? थट्टा करत आहात, तुम्ही सर्कस करत आहात. हा घोळ तुम्हीच घातलेला आहे, असा हल्लाबोल आदित्य ठाकरेंनी केला.

या सर्व प्रकाराविरोधात आम्ही स्वतः ३ ते ४ हजार हरकती नोंदवल्या आहेत. निवडणूक आयोगाला जाब विचारण्यासाठी आम्ही पत्र दिले असून, या विरोधात मोठी जनचळवळ उभी करू, असा इशारा आदित्य ठाकरे यांनी दिला आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०३ डिसेंबर २०२५

# देसरडा महाविद्यालयात देवमाणसाला अभिवादन







**छत्रपती संभाजीनगर :** येथील मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा महाविद्यालयात स्व. प्राचार्य डॉ. शांतीलालजी देसरडा यांना श्रद्धांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हसन इनामदार यांनी सांगितले की, स्व. प्राचार्य डॉ. शांतीलालजी देसरडा हे एक आदर्श शिक्षक, उत्कृष्ट डॉक्टर आणि होमिओपॅथी क्षेत्रात समर्पणाने काम करणारे, विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि आपल्या संपर्कात येणाऱ्या सर्वांचे हितचिंतक होते. प्रत्येकाला मदत करणे हा त्यांचा स्वभाव होता. प्रत्येक गोष्टीत आम्हाला त्यांची दुरदृष्टी दिसायची. त्यांच्या मदतीमुळे माझ्यासारख्या असंख्य माणसांना आपापल्या क्षेत्रात यशस्वी होण्याची संधी मिळाली. देसरडा सर म्हणजे माणसातील 'देवमाणूस' होते. असे सांगून आज प्रत्येक पावलापावलावर आनंद आणि दुःखाच्या क्षणी सुद्धा 'सर आज असायला हवे होते' असे वाटते. सरांच्या जाण्याने जी पोकळी आमच्या सारख्यांच्या जीवनात निर्माण झाली ती कधीही न भरून येणारी आहे. सरांचे कार्य आणि कर्तृत्व येणाऱ्या पिढ्यांसाठी प्रेरणादाई नक्कीच आहे यात शंका नाही असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन साहिल इनामदार यांनी केले तर कार्यालयीन अधिक्षक नुतन राजपूत यांनी उपस्थितांचे आभार मानले. या प्रसंगी डॉ. भाग्यश्री राठोड, प्रा. रामेश्वरी बिडवे, शंतनु खांडे, मुकेश लहरे, आशिया शेख, रीना राऊत आदींसह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## खुली काव्य वाचन आणि कथा लेखन स्पर्धा : प्रगतिशील साहित्य संमेलनाच्या निमित्ताने आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** संविधान मूल्यांचे संवर्धन आणि प्रतिष्ठा ही संकल्पना घेऊन प्रगतिशील साहित्य संमेलन २०२५ निमित्ताने खुल्या काव्य वाचन आणि कथा लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, दि. २५ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २ वाजता गांधी भवन, म. गांधी स्मारक निधी केंद्र, विभागीय ग्रंथालयाजवळ, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर येथे या स्पर्धा होतील.

काव्यवाचन आणि कथा लेखन स्पर्धेसाठी स्वतंत्रपणे प्रथम पारितोषिक प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह आणि रोख ११११, द्वितीय पारितोषिक प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह आणि रोख ७७७, तृतीय पारितोषिक प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह आणि रोख ५५५ तसेच दोन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह असणार आहे.

काव्यवाचन स्पर्धेसाठी नियम व अटी अशा...
१) स्वलिखित एक कविता सादर करता येईल
२) कवितेची वेळ तीन ते चार मिनिटे असेल
३) प्रवेश शुल्क शंभर रुपये राहील
४) कवींना २० डिसेंबर पर्यंत फोनवर नोंदणी अनिवार्य.

कथा लेखन स्पर्धेच्या नियम व अटी अशा...
१) तीन हजार शब्द मर्यादांपर्यंत स्वलिखित कथा असावी
२) प्रवेश शुल्क शंभर रुपये राहील
३) कथा २० डिसेंबर २०२५ पर्यंत पीडीएफ व्हाट्सअप करावी किंवा हार्डकॉपी जमा करावी
परीक्षकांचा निकाल अंतिम
परीक्षकांचा निकाल अंतिम राहणार आहे. कथा लेखन आणि कविता वाचन स्पर्धेचा निकाल व पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते प्रगतिशील साहित्य संमेलनात केले जाईल, असे संयोजकांच्या वतीने सांगण्यात आले आहे.

येथे करा संपर्क
स्पर्धेत सहभागी होण्यासाठी डॉ. दत्तात्रय डुंबरे ९८६०६१२११९, कवी सुनील उबाळे ९९७०१२१९१९, कवयित्री आशा डांगे ९७६४४५५५९७, कवी चक्रधर डाके ८२७५२३८४१३, कवयित्री सविता लोंढे ९४२३४०५५८१, कवयित्री माधुरी चौधरी ९४२१८६०८७३ आणि डॉ. समाधान इंगळे ९४२२९४००२ यांच्याशी संपर्क साधून नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
■ प्रोजेक्ट रिपोर्ट ■ डेझर्टेशन
■ पीएच.डी./एम.फिल.थेसिस ■ कलर प्रिंट
■ डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट ■ स्कॅनिंग
■ स्पायरल व हार्ड बायडींग ■ लॅमिनेशन
महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०३ डिसेंबर २०२५


## इतिहास-निसर्गाच्या सहप्रवासात कस्तुरबा इंग्लिश स्कूलची ज्ञानमोहिम




**चापानेर :** श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल, चापानेर आयोजित बहुप्रतिक्षित शैक्षणिक सहल उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. विद्यार्थ्यांनी सातारा शहर तसेच आसपासच्या ऐतिहासिक आणि निसर्गरम्य स्थळांना भेट देत एक वेगळाच अनुभव मिळवला.सहलाची सुरुवात सातारा शहरातील दोनही राजवाड्यांच्या भेटीने झाली. येथील शिल्पकला, वास्तुकला आणि ऐतिहासिक दालनांनी विद्यार्थ्यांना इतिहासाचा थेट अनुभव दिला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सज्जनगड, सातारा ऐतिहासिक संग्रहालय, तसेच प्रतापगड किल्ला या महत्त्वपूर्ण ठिकाणांचा अभ्यासपूर्वक फेरफटका घेतला. शिवकालीन गड-किल्ल्यांची वैशिष्ट्ये, छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची माहिती आणि त्यामागील इतिहास यांची सखोल ओळख विद्यार्थ्यांना प्राप्त झाली.निसर्गसौंदर्याचा मनसोक्त आनंद लुटण्यासाठी विद्यार्थ्यांनी ठोसेघर धबधबा आणि कास पठार येथे भेट दिली. कास पठारावरील फुलांचे अनोखे वैविध्य, शांत वातावरण आणि निसर्गाची विविध रूपे विद्यार्थ्यांच्या मनावर कोरली गेली.सहल पुढे दापोली बीचकडे सरकली. समुद्राच्या लाटांशी खेळत, समुद्रकिनाऱ्याचे सौंदर्य अनुभवत विद्यार्थ्यांनी सहलीच्या आठवणी अधिक रंगतदार केल्या. अखेरीस सहल रायगड किल्ल्यावर संपन्न झाली. रायगडचे भव्य रूप, ऐतिहासिक अवशेष आणि टकमक टोकाची रोमांचकता पाहून विद्यार्थी भारावून गेले.मार्गदर्शक व शिक्षकांच्या सततच्या सहकार्यामुळे ही सहल शैक्षणिकदृष्ट्या समृद्ध आणि अत्यंत यशस्वी ठरली. विद्यार्थ्यांच्या इतिहास, भूगोल आणि संस्कृतीविषयीच्या जिज्ञासेला या सहलीने नवी दिशा मिळाल्याचे शाळेच्या व्यवस्थापनाने सांगितले.ही सहल विद्यार्थ्यांसाठी ज्ञान आणि आनंद यांचा अविस्मरणीय संगम ठरली.सहल यशस्वितेसाठी संस्था अध्यक्ष श्री दशरथ सोमासे सर यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य कौशल्या सोमासे, संदीप वाकडे,वर्षा जाधव, भारती पवार, मनिषा पवार, आकांक्षा वैष्णव,दुर्गा वैष्णव, अभिलाषा वारखिंडे, दिव्या लोखंडे,पूजा लोखंडे , कविता हिरे, अंकुश राठोड,राजू राठोड आदींनी परिश्रम घेतले

## श्री. बसवराज पुरंत यांची मुख्याध्यापक म्हणून नियुक्ती



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी श्री.बसवराजजी पुरंत यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली., श्री दत्तात्रेयजी गायकवाड ३९ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर ३० .११ .२०२५ रोजी ते सेवानिवृत्त झाले, त्यांच्या जागी संस्थेने याच सोहळयामध्ये विद्यार्थ्यासह विद्यालयचा सर्वांगीण विकासाचा दृष्टिकोन बाळगणारे श्री पुरंत सर यांची मुख्याध्यापक पदी नियुक्ती करण्यात आल्याची घोषणा श्री. हिरास सर यांच्या करवी करण्यात आली, पुरंत सर अत्यंत कर्तव्यदक्ष शिक्षक असून ते अतिशय विद्यार्थीप्रिय आहेत.दत्तात्रय गायकवाड यांच्या लोकप्रिय कारकिर्दीनंतर श्री पुरंत सरांकडूनही संस्थेच्या शैक्षणिक विकासात,निश्चितच मनाचा तुरा खोवला जाईल असा मला विश्वास वाटतो असे गौरवोद्गार संस्थेचे संचालक हिरास सरांनी काढले.आज विद्यालयात येऊन त्यांनी पदभार स्वीकारताच, माजी विद्यार्थी संघटनेकडून त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.याप्रसंगी , विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री रवीजी पाटील सर, प्राथमिक विद्यालयाचे मावळते मुख्याध्यापक श्री दत्तात्रयजी गायकवाड सर, श्री जाधव मॅडम, श्री यादव मॅडम, श्री अधिराज गायकवाड सर, रितेश गायकवाड, नागेश सूर्यवंशी, श्रेयश रेड्डी, अभिषेक कदम, श्री चव्हाण आणि विद्यार्थी यांची उपस्थिती होती.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०३ डिसेंबर २०२५


## यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रतीक जाधव यांचे सी.ए. परिक्षेत यश



**सिल्लोड :** यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचा वाणिज्य विभागाचा विद्यार्थी प्रतीक राजेंद्र जाधव याने सी.ए. परिक्षेत घवघवीत यश संपादन केले. त्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पंडित यांच्या हस्ते प्रतीकचा सत्कार करण्यात आला. अत्यंत अवघड समजली जाणारी ही परीक्षा प्रतीक ने आपल्या मेहनतीने उत्तीर्ण केली. प्रतीक महाविद्यालयाचा नियमित विद्यार्थी होता.या अगोदर ही महाविद्यालयातील ५ विद्यार्थी ही परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. वाणिज्य विभागातील इतर विद्यार्थ्यांनी प्रतीक चा आदर्श घेऊन असेच यश मिळवावे असे प्राचार्य डॉ. अशोक पंडित यांनी आवाहन केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. जी.एन. मोरे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. आर.एल. कबले, डॉ. डी.आर. पानझाडे व सर्व प्राध्यापक वृंद यांनी प्रतीकचे अभिनंदन केले.

## मुरूम नगर परिषद निवडणुकीत ६७.४१ टक्के मतदान



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी मंगळवारी (दि २) मतदान प्रक्रिया पार पडली.या निवडणुकीत १४९१७ मतदारांपैकी १००५७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.यामध्ये ४७४४ महिला मतदारांनी तर ५३१३ पुरुष मतदारांनी मतदान करून लोकशाही समृद्ध करण्यासाठी कर्तव्य पार पाडले.नगराध्यक्ष पदाचे ४ तर २० सदस्यांसाठीच्या ५७ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले आहे.प्रत्येक प्रभागात दोन असे दहा प्रभागात एकूण २० ठिकाणी मतदान केंद्र तयार करण्यात आले होते.मतदाना दरम्यान मतदारांत उत्साह दिसून आले.६७.४१ टक्के मतदान झाले असून मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून लोहारा येथील तहसीलदार रणजीतसिंह कोळेकर,सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मनिषा वडेपल्ली,पालिकेचे श्रीराम नाडे,राहुल यादव यांनी काम पाहिले.मतदाना दरम्यान अनुचित प्रकार घडू नये यासाठी मुरूम पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ संदीपान दहिफळे यांनी सहकारी कर्मचाऱ्यांसह चोख बंदोबस्त ठेवला होता.प्रभाग क्रमांक ७ आणि १० यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर वाचनालय व स्पेशल शाळेत मतदान केंद्र ठेवण्यात आले होते.मात्र मतदानासाठी जात असताना अण्णाभाऊ साठे चौक ते डॉ आंबेडकर वाचनालय दरम्यान असलेल्या रस्त्यावरील गटारीवर गतिरोधक असल्याने यावरून तीनचाकी रिक्षा व चारचाकी छोटे वाहन घेऊन जाण्यासाठी वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत होती.निवडणूक विभागाकडून कर्मचाऱ्यांसाठी सकाळचा नास्था व दुपारच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. मात्र ही व्यवस्था केवळ मतदान केंद्रावर तैनात असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी असल्याचे सांगितले गेल्याने सुरक्षेसाठी मतदान केंद्रावर २०० मिटरच्या अंतरात तैनात असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना उपाशी पोटी कर्तव्य बजावावे लागले.

## नदीविना माणसाची

बालपणी पाहिलेली काळजात रुजलेली
भर उन्हात वाहणारी नदीमाय स्वप्नात आली

हिरव्या तिच्या थडीवर वनराई सजली होती
पडितातील गवतात गाई वासरं रमली होती
वाहत्या पाण्यामध्ये सवंगडी डूबत होते
वाळूचा खोपा करण्या रमून सारे जात होते

अन् अचानक स्वप्नांत जीवघेणा पूर आला
वाळूच्या खोप्यासोबत लेकरं बाळं घेऊन गेला

गाव शिवाराची माती पिकासोबत
खंगाळली
पाखरांची घरटीही पुरामध्ये वाहून गेली

जाग येता सकाळी नदी धरणात बुडालेली
हिरव्या वनराई सोबत गाई वासरं हरवलेली

नदीविना माणसाची होरपळली जिंदगाणी
बालपणीच्या दिवसाची हरवून गेली गाणी



**ज्ञानेश्वर गायके,कन्नड**
मो.9403384889


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.





# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०३ डिसेंबर २०२५


# आंतरराष्ट्रीय अपंग व्यक्ती दिनाचे समाजशास्त्रीय चिंतन

**स**माज ही केवळ लोकांची रचना नसून, तिच्या प्रत्येक घटकाच्या सहभागावर आधारित एक सजीव प्रणाली आहे, जिथे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनमानाचा स्तर, संधी, अधिकार आणि सामाजिक प्रतिष्ठा त्याच्या शारीरिक, मानसिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थितीवर अवलंबूनअसते. या दृष्टीने पाहिल्यास, अपंग व्यक्तींचा अनुभव केवळ वैयक्तिक अडचणींचा विषय नसून तो संपूर्ण समाजाच्या मानसिकता, मूल्य प्रणाली, धोरणे आणि व्यवहार यांचे प्रतिबिंब आहे. दरवर्षी 3 डिसेंबर रोजी साजरा केला जाणारा 'आंतरराष्ट्रीय अपंग व्यक्ती दिन' हा दिवस केवळ जागरूकता निर्माण करण्यापुरताच नाही, तर तो समाजातील समावेशी धोरणांचा विचार करण्याचा, अपंग व्यक्तींच्या जीवनातील अडचणी ओळखण्याचा, त्यांना समान संधी उपलब्ध करून देण्याचा आणि समाजातील नकारात्मक दृष्टिकोन बदलण्याचा महत्त्वपूर्ण प्रसंग आहे.

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून, अपंग व्यक्ती ही एक सामाजिक गट म्हणून दिसते, ज्यांच्यावर शारीरिक, मानसिक किंवा अन्य अडचणींमुळे अनेक स्तरांवर भेदभाव होतो, आणि त्यांच्या सामाजिक सहभागाला मर्यादा येतात. शिक्षणाच्या क्षेत्रात, अपंग व्यक्तींना अनेकदा विशेष शैक्षणिक साधने, समायोजने आणि सहाय्य उपलब्ध नसते, ज्यामुळे त्यांचे बौद्धिक, कौशल्यात्मक आणि सामाजिक विकासावर थेट परिणाम होतो. याचा प्रभाव भविष्यातील रोजगाराच्या संधींवर, आर्थिक स्वावलंबनावर, आत्मसन्मानावर आणि समाजातील प्रतिष्ठेवर पडतो. रोजगार क्षेत्रातही अपंग व्यक्तींना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते, जसे की कार्यक्षेत्रात आवश्यक सुविधा न मिळणे, अपंगतेवर आधारित पूर्वग्रह, किंवा त्यांच्या क्षमतांबाबत चुकीची समजुती निर्माण करणे. याचा थेट परिणाम त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर, सामाजिक सहभागावर आणि मानसिक स्वास्थ्यावर होतो.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे स्पष्ट होते की अपंग व्यक्तींच्या जीवनातील ह्या अडचणी केवळ वैयक्तिक नसून त्या समाजाच्या मानसिकता, मूल्ये, धोरणे आणि सामाजिक संरचना यांच्याशी संबंधित आहेत. अपंग व्यक्तींच्या जीवनात करुणा, दया, उपेक्षा किंवा अस्वीकृतीची भावनाही समाजातील अपूर्ण मानसिक प्रतिमांनाचे प्रतीक आहे. जर समाजाने अपंग व्यक्तींविषयी सकारात्मक दृष्टिकोन ठेवला, त्यांना योग्य संधी उपलब्ध करून दिल्या, सार्वजनिक जागांमध्ये सुलभता निर्माण केली आणि शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सांस्कृतिक कार्यक्रमात समावेश केला, तर समाजाच्या नैतिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगतीला मोठा गती मिळेल. अपंग व्यक्तींचा सामाजिक सहभाग मर्यादित असल्यास त्यांच्या अनुभवांचा, मतांचा आणि कल्पनांचा समाजाच्या निर्णय प्रक्रियेत समावेश होत नाही, ज्यामुळे संपूर्ण समाजाच्या प्रगतीवर प्रतिकूल परिणाम होतो.

सामाजिक समावेश, समान संधी, सार्वजनिक स्वीकृती आणि न्याय यासाठी धोरणात्मक उपाय करणे ही फक्त नैतिक जबाबदारी नसून समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अत्यावश्यक आवश्यकता आहे. अपंग व्यक्तींना समान अधिकार आणि संधी उपलब्ध करून दिल्यास, ते केवळ स्वतःच्या जीवनात उन्नती करतात, तर समाजाच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान देतात. अपंग व्यक्तींच्या अडचणी शारीरिक, मानसिक किंवा संवेदनशीलता यांच्या पलीकडे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय स्तरावर प्रतिबिंबित होतात. सामाजिक जीवनात त्यांच्या सहभागाची मर्यादा असल्यास, समाजाच्या निर्णय प्रक्रियेत त्यांच्या अनुभवांचा आणि दृष्टिकोनांचा समावेश होत नाही, ज्याचा परिणाम संपूर्ण सामाजिक प्रगतीवर होतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून असे लक्षात येते की अपंग व्यक्तींच्या अडचणींचे निराकरण ही संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. योग्य शिक्षण, रोजगार, आरोग्य सेवा, सार्वजनिक सुविधा, सामाजिक जागरूकता आणि समावेशी धोरणे या माध्यमातूनच अपंग व्यक्तींच्या जीवनात सुधारणा घडवता येते.

जगातील अनेक देशांनी अपंग व्यक्तींना समान संधी आणि अधिकार सुनिश्चित करणारे कायदे लागू केले आहेत, परंतु प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी, समाजाची मानसिकता बदलणे आणि सार्वजनिक स्वीकृती सुनिश्चित करणे हेच खरे उपाय ठरतात. अपंग व्यक्तींच्या जीवनातील अडचणींचा अभ्यास केवळ त्यांच्या अडचणी ओळखण्यापुरताच मर्यादित राहणार नाही, तर समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून त्यावर उपाय सुचवणे, सामाजिक समज वाढवणे आणि समावेशी समाज घडविणे आवश्यक आहे. अपंग व्यक्तींच्या जीवनातील सुधारणा ही केवळ त्यांच्या स्वतःसाठी नाही, तर समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे. यासाठी शासन, शाळा, रोजगार क्षेत्र, समुदाय, कुटुंब आणि प्रत्येक नागरिकाचे सकारात्मक योगदान आवश्यक आहे. अपंग व्यक्तींना समान अधिकार, संधी आणि सार्वजनिक स्वीकृती उपलब्ध झाल्यास, ते स्वतःच्या जीवनात उन्नती करतात आणि समाजाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि नैतिक प्रगतीतही मोलाचे योगदान देतात.

समाजातील समावेश, सामाजिक न्याय, समान संधी आणि सर्वांगीक विकासासाठी अपंग व्यक्तींच्या जीवनमानातील सुधारणा ही अत्यंत गरजेची बाब आहे. सामाजिक अडथळे दूर करून, समान संधी, समावेश आणि सामाजिक स्वीकृती मिळवून देणे हाच खरा सामाजिक विकास मानला जातो. अपंग व्यक्तींच्या अडचणी दूर करण्यासाठी सामाजिक अभियान, सार्वजनिक धोरणे, सामूहिक चर्चासत्रे, शैक्षणिक कार्यक्रम आणि माध्यमांतून जनजागृती करणे आवश्यक आहे. हे उपाय फक्त कागदोपत्री नसून प्रत्यक्ष सामाजिक बदल घडवू शकतात. समाजातील प्रत्येक घटकाचे जीवन सन्माननीय असावे, सर्वांना समान संधी मिळाव्यात आणि अपंग व्यक्तींच्या जीवनात सुधारणा घडवून आणणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. अपंग व्यक्तींच्या जीवनातील अडथळे दूर करणे आणि त्यांना समान संधी देणे हे समाजाची नैतिक, सामाजिक आणि आर्थिक प्रगती सुनिश्चित करते.

3 डिसेंबर हा दिवस फक्त स्मरणार्थ किंवा जागरूकतेसाठी नाही, तर तो समाजातील प्रत्येक घटकाला विचार करण्याची, आपले मानसिक प्रतिमान बदलण्याची, आणि समावेशी धोरणे अंगीकारण्याची संधी देतो. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहता, अपंग व्यक्तींच्या जीवनातील सुधारणा हा प्रश्न समाजाच्या सर्व घटकांशी संबंधित आहे. अपंग व्यक्तींना समान संधी, स्वातंत्र्य, आणि सामाजिक स्वीकृती दिल्यास, ते स्वतःच्या जीवनात उन्नती करतात आणि समाजाच्या सर्वांगीक प्रगतीतही महत्त्वपूर्ण योगदान देतात. त्यामुळे आजच्या आंतरराष्ट्रीय अपंग व्यक्ती दिनानिमित्त समाजातील प्रत्येक नागरिकाने स्वतःच्या मानसिकतेचा आढावा घ्यावा, अपंग व्यक्तींविषयी संवेदनशीलता वाढवावी, आणि त्यांना समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात संधी देण्यासाठी प्रयत्न करावे. अपंग व्यक्तींच्या समस्यांचे निराकरण करणे, त्यांना समान अधिकार, संधी, आणि सामाजिक स्वीकृती मिळवून देणे ही केवळ सामाजिक जबाबदारी नाही, तर समाजाच्या नैतिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि सामाजिक प्रगतीसाठी अनिवार्य आहे.

आजही अनेक ठिकाणी अपंग व्यक्तींवर विविध स्वरूपातील भेदभाव दिसून येतो; सामाजिक समावेश, समान संधी आणि सार्वजनिक स्वीकृतीची गरज अजूनही पूर्ण झालेली नाही. त्यामुळे अपंग व्यक्तींच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक सहभागाला चालना देणे, त्यांच्या अधिकारांसाठी लढणे, आणि समाजातील नकारात्मक दृष्टिकोन बदलणे हे केवळ आव्हान नाही, तर सामाजिक जबाबदारी आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केल्यास, अपंग व्यक्तींच्या जीवनातील सुधारणा ही केवळ त्यांची समस्या नाही, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे, आणि त्यासाठी प्रत्येक घटकाला शासन, शाळा, कामकाजाचे ठिकाण, समुदाय आणि कुटुंब सकारात्मक भूमिका पार पाडणे आवश्यक आहे.

अपंग व्यक्तींना समान संधी, स्वातंत्र्य आणि सामाजिक स्वीकृती मिळाल्यास, ते स्वतःच्या जीवनात उन्नती करतात आणि समाजाच्या सर्वांगीक प्रगतीतही मोलाचे योगदान देतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, अपंग व्यक्तींच्या जीवनातील सुधारणेचा प्रश्न हा संपूर्ण समाजाच्या प्रगतीशी जोडलेला आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय अपंग व्यक्ती दिन फक्त स्मरणार्थ दिवस नाही, तर तो समाजाला सुधारणा घडविण्यासाठी, सकारात्मक दृष्टिकोन अंगीकारण्यासाठी, आणि अपंग व्यक्तींना समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रेरित करणारा एक महत्त्वपूर्ण दिन आहे. समाजातील अपंग व्यक्तींच्या अडचणी दूर करून त्यांना समान संधी, समावेश आणि सामाजिक स्वीकृती मिळवून देणे हाच खरा सामाजिक विकास आणि मानवतेची खरी कसोटी आहे.




**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
मो. 9960103582
bagate.rajendra५@gmail.com


# कन्नड ग्रामीण भागात मका खरेदी केंद्र सुरु करा



**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड प्रमाणेच तालुक्यातील औराळा, पिशोर, देवगाव रंगारी, चिंचोली येथे ही शासकीय मका खरेदी केंद्र सुरु करण्याची मागणी शिवसेना (उबाठा) तालुका संघटक, कन्नड तालुका संघर्ष समिती चे अध्यक्ष तथा मा.जि.प. अध्यक्ष डॉ. आण्णासाहेब शिंदे यांनी केली आहे.या संदर्भात जिल्हा मार्केटिंग अधिकारी छत्रपती संभाजीनगर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शासनाच्या वतीने तालुक्यात मका खरेदी केंद्र दि. ०३ डिसेंबर पासून सुरु करण्या बाबत निर्माण घेण्यात आला आहे. सदरील मका खरेदी केंद्र कन्नड येथे सुरु करण्याबाबत ची कार्यवाही होत असल्याची माहिती आहे. कन्नड तालुक्यात मका पिकाचा ५० टक्क्यांनी पर्यंत पेरा असून शेतकर्यांनी मोठ्या प्रमाणात मका पिक घेतले आहे. त्यामुळे शासनाने यापूर्वी सुरु केलेल्या केंद्रांवर दि. ०३ डिसेंबर पासून मका खरेदी करण्यात यावी. दोन वर्षां पूर्वी औराळा, देवगाव रंगारी, पिशोर, चिंचोली या केंद्रांवर मका खरेदी करण्यात येत होती. त्यामुळे तेथील ही मका खरेदी केंद्रांवरती ही खरेदी सुरु करुण शेतकर्यांना न्याय द्यावा अशी मागणी डॉ. आण्णासाहेब शिंदे यांच्या सह शिवसेना उपतालुका प्रमुख नवनाथ राठोड, उदय सोनवणे, राजू साळुंखे आदींनी केली आहे.दरम्यान शेतकऱ्यांनी आपल्या मका विक्री नोंदणीसाठी, मका नोंद असलेला सात बारा उतारा,आधार कार्ड, बँक पासबुक छायांकित प्रत, ही कागदपत्र घेऊन खरेदी विक्री संघात आज पासून नोंदणी करावी.असे आवाहन डॉ. शिंदे यांनी केले आहे.

## बहुगुणी सफरचंद

आजीला आवडे
सफरचंदाचा ज्यूस
पितांना दिसते ती
भारी खुश

आजोबाला आवडे
सफरचंद किसून
दिमाखात खातात
पाटावर बसून

रोज सकाळी
बाबांना ते आवडी
नाश्त्याला खातात
चिरून बारीक फोडी

सफरचंद खाऊन
बुध्दी वाढवे ताई
अभ्यासात तल्लख
विचारू नका काही

खुश होतो दादा
सफरचंद पाहून
सुदृढ होण्यासाठी
टाकतो खाऊन

लहान बाळ
चेंडू म्हणून खेळते
चावा घेतांना
चव त्याला कळते




**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106



प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002